# अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) पूर्व उपनगरे यांचे न्यायालय

इंडस्ट्रीयल अॅश्यूरन्स बिल्डींग, पहिला मजला, चर्चगेट स्टेशन समोर, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०.
दुरध्वनी क्र.:२२८२०८१५/२२८२०८६६ Fax No.२२८२०७१२
Website:www.mumbaiencrochment.in Email:addcolc@gmail.com

अपिल क्र. एस.आर.ए/ पात्रता/स.आ.एन:विभाग/घाटकोपर/११२/२०२२
जा.क्र. ५११३

वादी ....

श्रीम. पुष्पा लोकनाथ सिंह
लोअर डेनेलड बिल्डिंग, रुम क्र.१०,
दुसरा माळा, रामजी असर लेन, एम.जी.रोड,
घाटकोपर (पुर्व) मुंबई-४०००७७.

**विरुद्ध**

**प्रतिवादी ....**

१) सहाय्यक आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी एन विभाग
बृहन्मुंबई महानगरपालिका, २ रा मजला, जवाहर रोड,
(पु) मुंबई-४०००७५.

२) अध्यक्ष/सचिव :- नालंदा एस.आर.ए.सह.गृह.संस्था (नियो.)
प्लॉट नं. २७३,२७४, दामजी कंपाऊड, पटेल चौक,
घाटकोपर (पु.) मुंबई-४०००७७.

३) विकासक : मे. मनो मॅग्नम नेस्ट प्रा.लि.
गोदरेज कोलेसिअम, अे विंग, १३०१,
१३ वा मजला, एव्हार्ड नगरच्या मागे, इस्टर्न एक्सप्रेस हायवे,
सायन (पु.) मुंबई- ४०००२२.

**महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा,निर्मुलन व पुर्नविकास) अधिनियम १९७१ चे कलम ३५ अन्वये अपिल (निकालपत्र दिनांक २९/ ९ /२०२२)**

---

**प्रस्तावना:**

महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसुचना क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१८/झोपनि-२, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निमुर्लन व पुर्नविकास), अधिनियम १९७१ (१९७१ चा महा.२८) यांच्या कलम ३ च्या पोट-कलम ३Y च्या उप-कलम (१) आणि कलम ३५ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारांचा वापर करुन बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व जमिनीकरिता उक्त अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करण्यांत आली आहे.

सक्षम प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त एन विभाग यांनी निर्गमीत केलेल्या नालंदा सह. गृह.संस्थेच्या परिशिष्ट-२ मध्ये वादी यांचे नाव समाविष्ट करुन वादी यांची पात्रता निश्चित करणेसाठी वादी यांनी प्रस्तुत अपील दि. १८/०७/२०२२ रोजी दाखल केले आहे.

## मिळकतीचे वर्णन

| | |
|---|---|
| मिळकतीचे वर्णन | मौजे. घाटकोपर या मिळकतीवरील |
| गृहनिर्माण संस्थेचे नाव | नालंदा एस.आर.ए.सह.गृह.संस्था (नियो.) |
| परिशिष्ट-२ मधील अ.क्र. | नाव समाविष्ट करणेबाबत |
| सक्षम प्राधिकारी | सहाय्यक आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी एन विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, घाटकोपर |

प्रस्तुत अपिलाचे अनुषंगाने वादी व प्रतिवादी यांना नोटीसा निर्गमित करुन सुनावणी घेणेत आली.

**वादी यांचे म्हणणे** :-

वादी यांनी त्यांच्या अपिल मेमोमध्ये नमूद केले आहे की, वादी हे सन १९९५ पुर्वी पासुन प्रश्नाधीन झोपडीमध्ये वास्तव्यास होते. सदरच्या प्रश्नाधीन झोपडीचे निष्कासन झाले आहे. वादी यांचेकडे प्रश्नाधीन झोपडीतील वास्तव्याचे पुरावे म्हणुन सर्वेक्षण पावती, गुमास्ता परवाना इत्यादी कागदपत्रे आहेत. वादी पुढे नमुद करतात की, सक्षम प्राधिकारी यांनी पारीत केलेल्या दि.२९/०५/२००० आणि दि. १४/०७/२००८ रोजीच्या परिशिष्ट-२ मध्ये वादी यांच्या नावाचा समावेश नसुन सदर संस्थेच्या परिशिष्ट-२ मध्ये वादी यांच्या नावाचा समावेश करुन अनिवासी पात्रता निश्चित करावी अशी विनंती प्रस्तुत अपील दि.१८/०७/२०२२ रोजी दाखल करुन केली आहे.

**वादी यांनी खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर केली आहेत.**

१. तहसिलदार अतिक्रमण, कुर्ला यांनी श्री. लोकनाथ पृथ्वी सिंह यांना दि. १०/०५/१९९५ रोजी सरकारी जागेवरील अतिक्रमण बांधकाम तोडणेबाबत पाठविलेल्या नोटीसीची प्रत.
२. श्री. लोकनाथ पृथ्वी सिंह यांच्या नावे बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी निर्गमित केलेल्या झोपडीधारकांना ओळखपत्र देण्याकरीता करण्यात आलेल्या गणना पावती दि.१९/१२/१९९० ची प्रत.
३. दुकाने आणि आस्थापने विभाग बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी श्री. लोकनाथ पृथ्वी सिंह यांच्या नावे व ग्रास ट्रेडर्स यांच्या नावाने दि.११/०१/१९७९ व २१/०१/२०२१ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या दुकाने व आस्थापने प्रमाणपत्राच्या प्रती.
४. बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील श्री. सुनिल सिंह यांचे नाव असलेल्या दि. १३/०८/२०२१ रोजीच्या माहिती अधिकार २००५ च्या अर्जाची प्रत.
५. बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील श्री. गोविंद अवधनारायण शहा यांचे नाव असलेल्या दि. ०६/०९/२०१९ रोजीच्या माहिती अधिकार २००५ च्या अर्जाची प्रत.
६. श्री. लोकनाथ पृथ्वी सिंह यांचे नावे बृहन्मुंबई झोपडीधारकांचे ओळखपत्र सर्वेक्षण २००० पावती, पावती क्र. ०८४७९२० दि. २४/०७/२००० ची प्रत.

**प्रतिवादी क्र. १ व २ यांचे लेखी म्हणणे:-**

प्रतिवादी क्र. १ व २ यांनी कोणतेही लेखी म्हणणे सादर केलेले नाही.

२९/७/२२

**प्रतिवादी क्र.३ (विकासक) यांचे लेखी म्हणणे :-**

दि.१२/०९/२०२२ रोजी टपालाने दाखल केलेल्या लेखी म्हणण्यात प्रतिवादी क्र.३ यांनी नमुद केले आहे की, वादी यांनी दि.२९/०५/२००० व दि. १४/०७/२००८ रोजी मा. सचिव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकारण यांनी निर्गमीत केलेल्या परिशिष्ट-२ विरुध्द अपील दाखल करुन वादी यांना पात्र घोषीतक करण्याकरीता अपील दाखल केले आहे. परंतू वादी यांचे नाव दि.२९/०५/२००० व दि.१४/०७/२००८ रोजी निर्गमीत केलेल्या परिशिष्ट-२ मध्ये दाखविण्यात आले नाही. प्रतिवादी क्र.३ पुढे नमूद करतात की, वादी यांनी प्रस्तुत अपीलात प्रतिवादी क्र.३ यांच्या विरुध्द काही आरोप केले नाहीत. प्रतिवादी क्र.३ पुढे नमुद करतात की, वादी यांनी प्रश्नाधीन झोपडीचे अस्तित्व दाखविण्याकरीता काही एक कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. प्रतिवादी क्र.३ यांनी प्रश्नाधीन झोपडीच्या बाबतीत वादी सोबत कोणताही करारनामा केलेला नाही. प्रतिवादी क्र.३ पुढे नमुद करतात की, सक्षम प्राधिकारी यांनी कागदपत्रांची पडताळणी करुन वादी यांच्या पात्रतेबाबत निर्णय घेतल्यानंतर व तसेच या अधिकारीतेने वादी यांनी सादर केलेल्या कागदपत्रांनुसार वादी यांच्या पात्रतेबाबत दिलेल्या आदेशाची अमंलबजावणी प्रतिवादी क्र.३ प्रचलित नियमांनुसार करतील.

**निष्कर्ष :-**

वादी यांनी दाखल केलेले अपील व अपीलात उपलब्ध असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, मौजे-घाटकोपर, ता. कुर्ला, न. भू. क्र. ५८०८, ५८०९, प्लॉट नं. २७३ आणि २७४, टी. पी. एस.-III या मिळकतीवर नालंदा सहकारी गृहनिर्माण संस्था (नि.) या संस्थेचे परिशिष्ट-२ सक्षम प्राधिकारी तथा तथा सहाय्यक आयुक्त, एन विभाग (घाटकोपर) बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दि. २९/०५/२००० रोजी निर्गमित केले आहे. सदर संस्थेच्या परिशिष्ट-२ मध्ये वादी यांचे नाव समाविष्ट करुन पात्रता निश्चित करणेसंदर्भात वादी यांनी या कार्यालयात दिनांक १८/०७/२०२२ रोजी प्रस्तुतचे अपील दाखल केलेले आहे.

वादी यांनी अपीलासोबत तहसिलदार अतिक्रमण, कुर्ला यांनी श्री. लोकनाथ पृथ्वी सिंह यांना दि. १०/०५/१९९५ रोजी सरकारी जागेवरील अतिक्रमण बांधकाम तोडणेबाबत पाठविलेल्या नोटीसीची प्रत, श्री. लोकनाथ पृथ्वी सिंह यांच्या नावे बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी निर्गमित केलेल्या झोपडीधारकांना ओळखपत्र देण्याकरीता करण्यात आलेल्या गणना पावती दि.१९/१२/१९९० ची प्रत, दुकाने आणि आस्थापने विभाग बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी श्री. लोकनाथ पृथ्वी सिंह यांच्या नावे व ग्रास ट्रेडर्स यांच्या नावाने दि.११/०१/१९७९ व २१/०१/२०२१ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या दुकाने व आस्थापने प्रमाणपत्राच्या प्रती, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील श्री. सुनिल सिंह यांचे नाव असलेल्या दि. १३/०८/२०२१ रोजीच्या माहिती अधिकार २००५ च्या अर्जाची प्रत, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील श्री. गोविंद अवधनारायण शहा यांचे नाव असलेल्या दि. ०६/०९/२०१९ रोजीच्या माहिती अधिकार २००५ च्या अर्जाची प्रत, श्री. लोकनाथ पृथ्वी सिंह यांचे नावे बृहन्मुंबई झोपडीधारकांचे ओळखपत्र सर्वेक्षण २००० पावती, पावती क्र. ०८४७९२० दि. २४/०७/२००० ची प्रत इत्यादी कागदपत्रे सादर केलेली आहेत.

वादी यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, वादी यांनी सदर झोपडीबाबत श्री. लोकनाथ पृथ्वी सिंह यांचे नावे असलेली बृहन्मुंबईसाठी झोपडीधारकांचे ओळखपत्र सर्वेक्षण २००० पावती क्र. ०८४७९२० दि. २४/०७/२००० ची प्रत व दुकाने आणि आस्थापने विभाग बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी श्री. लोकनाथ पृथ्वी सिंह यांच्या नावे व ग्रास ट्रेडर्स यांच्या नावाने दि.११/०१/१९७९ व २१/०१/२०२१ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या दुकाने व आस्थापने प्रमाणपत्राच्या प्रती सादर केल्या आहेत. शासन निर्णय दिनांक २६/०५/२०१५ मधील विवरणपत्रात नमुद केल्याप्रमाणे राज्य शासनामार्फत संदर्भाकित दिनांक ११/०७/२००१ च्या आदेशानुसार

23/3/22

राबविण्यांत आलेल्या " पात्र झोपडीवासियांकरीता ओळखपत्र योजना २००१ नुसार देण्यांत आलेले गणना फॉर्म" हा पुरावा ग्राह्य धरण्यांत आलेला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणांत सर्वेक्षण पावतीच्या आधारे गणना फॉर्म निर्गमित केला आहे किंवा कसे? याची खातरजमा सक्षम प्राधिकारी यांनी करणे आवश्यक आहे. वादी यांनी सदर झोपडीबाबत वादी यांचे पति श्री. लोकनाथ पृथ्वी सिंह यांचे नावे पुरावे सादर केलेले आहेत. त्यामुळे श्री. लोकनाथ पृथ्वी सिंह यांना पुनर्वसनाचा लाभ दिला आहे किंवा कसे याबाबत सक्षम प्राधिकारी यांनी खातरजमा करावी. सदर झोपडी निष्कासित होईपर्यंत सदर झोपडीमध्ये वादी यांचे सलग वास्तव्य असणे आवश्यक आहे. याबाबतही खातर जमा करणे आवश्यक आहे. तसेच सदर प्रकरण सक्षम प्राधिकारी यांचेकडे फेरपडताळणीसाठी पाठविणे आवश्यक आहे. वादी यांनी दाखल केलेले पुरावे हे झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येणाऱ्या झोपडीचे आहेत का? त्या ठिकाणी स्वत:चा वापर होता का? सदर झोपडीचा वापर कोणत्या प्रयोजनार्थ केला जात असे ? याची सक्षम प्राधिकारी यांनी स्वत: प्रत्यक्ष स्थळपाहणी करुन विस्तृत चौकशी करुन, अभिलेखाची व सादर पुराव्यांची सत्यता पडताळणी करुन खात्री करावी. तसेच सदर पुराव्यांच्या आधारे वादी यांच्या कुटुंबातील अन्य व्यक्तींना पुनर्वसनाचा लाभ दिला आहे अगर कसे? याची मुळ अभिलेखावरुन पडताळणी करुन खातरजमा करावी. तसेच वादी सदर संस्थेचे सभासद होते किंवा कसे ? तसेच वादी यांना विकासकाकडून भाडे स्वरुपात काही रक्कम मिळत होती किंवा कसे? तसेच स्थळ दर्शक नकाशात वादी यांची झोपडी कोणत्या क्रमांकावर दर्शविलेली आहे ? तसेच विकासक, संस्था व वादी मधील झोपडीबाबतचा करारनामा यामध्ये सक्षम प्राधिकारी यांनी स्वत: खातरजमा करावी. सक्षम प्राधिकारी यांच्या पडताळणी अंती वादातील झोपडे दिनांक ०१/०१/२००० पूर्वीचे सिध्द झाल्यास व वादी यांचे झोपडीतील सलग अनिवासी वापराबाबतची खातरजमा झाल्यास वादी यांचे नाव परिशिष्ट-२ मध्ये समाविष्ट करणेबाबत व पात्रतेबाबत गुणवत्तेवर निर्णय घ्यावा असे माझे मत आहे. मी तेजूसिंग पवार, अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) पूर्व उपनगरे खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

प्रमाणित प्रत
अर्जाची तारीख २५/११/२२ नक्कल फी रु. 26 X 4
प्रत तयार केल्याची तारीख २/१२/२२ निरीक्षण फी रु.
प्रत दिल्याची तारीख २/१२/२२ तात्काळ फी रु. 1045

१. अपिल क्र.एस.आर.ए./पात्रता/ स.आ.एन विभाग/ घाटकोपर/११२/२०२२ अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. वादी यांनी या आदेशापासून १ महिन्यांच्या आत सहाय्यक आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, "एन" विभाग, यांचेकडे पुराव्यासह अर्ज करावा. सक्षम प्राधिकारी यांनी अर्ज प्राप्त झाल्यास, उपरोक्त निर्देशाच्या अनुषंगाने चौकशी करुन, वादी यांचे नाव समाविष्ट करणेबाबत व पात्रतेबाबत गुणवत्तेवर ३ महिन्यांच्या आत निर्णय घेण्यात यावा.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

४. सर्व संबंधितांना निर्णय डाकव्दारे कळविण्यात यावा.

अपर जिल्हाधिकारी (अतिक्रमण निष्कासन)
पूर्व उपनगरे, मुंबई

29/11/22

(तेजूसिंग पवार)
अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का)
पूर्व उपनगरे